21 JAN 2025
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षणातील विद्यार्थ्यांनी अधिकचे वाचन करावे

## सुनीलकुमार लवटे : विद्यापीठात ऑनलाईन व्याख्यान

कोल्हापूर, ता. २० : 'दूरशिक्षण पद्धतीतील विद्यार्थ्यांनी अधिकचे वाचन केल्यास त्यांचा शैक्षणिक अवकाश मोठ्या प्रमाणात व्यापलेला असेल. त्यांनी नवतंत्रज्ञानाचा वापर करावा. सध्याच्या सर्व क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेची चर्चा आहे. ही कृत्रिम बुद्धिमत्ता दूरशिक्षणाचा विस्तार आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत आयोजित विशेष ऑनलाईन वाचक - लेखक परिसंवादात ते बोलत होते. त्यांनी 'दूरशिक्षणातील दूरवाचन' या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-संचालक डॉ. के. बी. पाटील, उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे उपस्थित होते. डॉ. लवटे म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी बहुउद्देशीय वाचन करावे. त्यामुळे त्यांना नवी दृष्टी आणि भान प्राप्त होणार आहे. भविष्यातील रोजगाराच्या संधीसुद्धा उपलब्ध होणार आहेत. दूरशिक्षण माध्यमातून शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना वाचनापासून दूर राहून ज्ञान आत्मसात करता येणार नाही. ज्ञान आत्मसात करताना परिपूर्ण ज्ञानापर्यंत जाता आले पाहिजे. त्यासाठी वाचन हे आपल्या शिक्षणाचा एक अविभाज्य भाग व्हावा. जेणे करून आपले सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवन नक्कीच उंचावण्यासाठी मदत होणार आहे.' डॉ. प्रवीण लोंढे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संजय चोपडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2025
लोकमत

# कोल्हापुरात वसुंधरा महोत्सव आजपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभाग, किर्लोस्कर उद्योग समूह यांच्या वतीने किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आज, मंगळवारपासून सुरू होणार आहे. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. २३ जानेवारीपर्यंत हा महोत्सव सुरू राहील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ३५४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील आजअखेर ३५४ अभ्यासक्रमांचे
कोल्हापूर : निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात पदवी व
पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी बीए, बीएस्सी, बीटेक,
एमसीए, एमबीए, एमटेक आदी २७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १७४ केंद्रांवर सुरळीतपणे
झाल्या. परीक्षेला ३५ हजार ५७ विद्यार्थी उपस्थित होते. सोमवारी एमटेक (रुरल
टेक्नॉलॉजी), एमएस्सी (अल्कोहोल टेक्नॉलॉजी), एमएस्सी (झूलॉजी), लॉ (पाच
वर्षे) या पाच अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. भरारी पथकाकडून सांगली
पाच, सातारा चार गैरप्रकाराची नोंद करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन
मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2025
तरुण भारत

# श्रीपतराव चौगुले कॉलेजच्या भक्ती पाटीलला आठ पारितोषिके

**कोलोली :** श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी–कोतोली येथील मराठी विभागातील एम. ए. ची



विद्यार्थिनी भक्ती जगन्नाथ पाटील हिला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे एम.ए.मध्ये शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रामध्ये सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल प्रा. जी. एम. पवार, माधव ज्युलियन, प्रा. रामचंद्र कृष्णाजी पानसे बार्शी स्मृती, कै. श्रीमती जयश्री गुरुराज, गुरुवर्य कै. डॉ. विष्णू नारायण कुलकर्णी भाषा भूषण, उमा गिरीश, मराठी कथा लेखक दिनकर डी. भोसले तथा चारुता सागर व वेणूताई चव्हाण स्मृती अशी आठ पारितोषिके व रोख रक्कम प्रदान करण्यात आली. यासाठी तिला ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक–अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले, सचिव शिवाजीराव पाटील, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ. बी. एन. रावण, ॲक्टिव्हिटी प्रमुख डॉ. एस. एस. कुरलीकर, मराठी विभाग प्रमुख प्रा. ए. आर. महाजन, प्रा.पोवार यांचे मार्गदर्शन लाभले.